# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.01.2025** **वार:मंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- पंतप्रधानांच्या हस्ते आज उत्तराखंडमध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं तर ओडिशात मेक इन ओडिशा परिषदेचं उद्घाटन
- एक देश एक निवडणुकीवर तरूणांनी चर्चा करण्याचं पंतप्रधानांचं छात्र सेनेच्या मेळाव्यात आवाहन
- यंदाच्या उन्हाळ्यात कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्याचा भारत-चीन उभय देशांचा निर्णय

आणि

- 19 वर्षांखालील महिलांच्या विश्वकरंडक स्पर्धेत आज भारताचा मुकाबला स्कॉटलंडशी तर पुरूष संघाचा इंग्लंडविरूद्धच्या वीस षटकांच्या मालिकेतला तिसरा सामना आज राजकोटमध्ये

**नॅशनल गेम्स**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तराखंडमध्ये देहरादून इथल्या महाराणा प्रताप स्टेडियमवर 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन करणार आहेत. अनेक केंद्रीय मंत्री, भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे पदाधिकारी आणि राष्ट्रीय खेळाडू या उद्घाटन समारंभाला उपस्थित राहणार आहेत. उत्तराखंडमधल्या 8 जिल्ह्यातील 11 शहरांमध्ये 14 फेब्रुवारी पर्यंत या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या स्पर्धांच्या औपचारिक उद्घाटनापूर्वी 26 जानेवारीला उधमसिंगनगर मधील गोलापूर इथं आयोजित करण्यात आलेल्या ट्रायथलॉन स्पर्धेत मणिपूर आणि महाराष्ट्रानं पदकांची कमाई केली.

**ओडिशा पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ओडिशामध्ये आज उत्कर्ष ओडिशा या मेक इन ओडिशा परिषदेचें उद्घाटन होणार आहेत. ही परिषद प्रामुख्याने जागतिक गुंतवणुकीच्या दृष्टीने आयोजित करण्यात आली आहे. ओडिशाला पुर्वोदय दृष्टीकोनाचे केंद्र तसेच भारताचे आघाडीचे गुंतवणूक स्थळ आणि औद्योगिक केंद्र म्हणून स्थान देण्याच्या उद्देशाने ओडिशा सरकारने या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेतून राज्याला पाच लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक होण्याची आशा आहे. तसंच रोजगार निर्मितीत साडेतीन लाख वाढ रुपयांची वाढ होण्याचा अंदाज आहे.

**पंतप्रधान**

एक देश एक निवडणूक या अंतर्गत देशपातळीवर एकाचवेळी निवडणूक घेण्यावर भर दिला जातो आहे आणि तरुणांनी त्यावर सविस्तर चर्चा करावी असं आवाहन काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. लोकशाहीमध्ये अशी चर्चा होण्याची गरज असून, या अंतर्गत लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी व्हायला पाहिजे. या चर्चेत तरुणांनी सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी मोदींनी केले. दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या मेळाव्याला संबोधित करताना मोदी यांनी देशाच्या विकासात तरुणांच्या योगदानाचे कौतुक केलं. गेल्या दहा वर्षात तरुणांनी एक लाख 50 हजारपेक्षा अधिक स्टार्टअप सुरू केले आहेत आणि कंपन्यांमधील सर्वोच्च पदांवर तरुण नेतृत्व विराजमान आहे. असं पंतप्रधानांनी नमूद केलं.

**पंतप्रधान ट्रम्प**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत त्यांचं अभिनंदन केलं. त्यानंतर मोदी यांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, भारत आणि अमेरिका परस्पर हिताच्या आणि विश्वासार्ह भागदीरासाठी कटीबद्ध असून, उभय देशांतल्या लोकांच्या कल्याण आणि जागतिक शांतता, समृद्धी आणि सुरक्षितता यांच्यासाठी एकत्रित काम करतील.

**जयशंकर अबुधाबी**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर अबुधाबी इथं रायसीना मिडल ईस्टच्या उद्घाटन सत्रात बीजभाषण करणार आहेत. जयशंकर तीन दिवसांच्या संयुक्त अरब अमिरातीच्या दौऱ्यावर आहेत. अबुधाबी इथं भारतीय दुतावासाने आयोजित केलेल्या प्रजासत्ताक दिनालाही जयशंकर उपस्थित होते. यावेळी बोलताना, जागतिक व्यवस्थेत महत्त्वाचे बदल होत असताना, भारत आणि युएई दरम्यान वाढत्या समन्वयावर त्यांनी भर दिला. हा काळ आव्हाने आणि संधी या दोन्हींचा असतो, तेव्हाच खऱ्या मैत्रीची परीक्षा होते आणि ती अधिक बळकट होते असेही ते म्हणाले. उभय देशांमधील सामायिक मूल्ये आणि परस्पर विश्वास यांच्यावरही त्यांनी प्रकाश टाकला. परदेशतील भारतीय समुदायाच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी उपस्थित जनसमुदायाला दिली.

**पियूष गोयल**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल सध्या ओमानच्या अधिकृत दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात काल त्यांनी त्यांचे ओमानचे समपदस्थ कैस बिन महंमद अल युसुफ यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत प्रामुख्यानं सर्वंकष आर्थिक भागीदारी करार अर्थात सेपासंदर्भातील वाटाघाटी पुढे नेण्याविषयी, द्विपक्षीय व्यापार आणखी बळकट करण्याच्या आणि गुंतवणूक या मुद्द्यांवर फलदायी चर्चा केली. संयुक्त आयोगाच्या आगामी बैठकीत या वाटाघाटींना आणखी गती येईल असं सांगत गोयल यांनी सेपा प्रत्यक्षात येण्याच्या अनुषंगानं झालेल्या प्रगतीबद्दल आशा व्यक्त केली.

**जीबीएस केंद्रीय पथक**

महाराष्ट्रात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या रुग्णांची संख्या 111 झाली असून, त्यातले 16 रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर आहेत. राज्यातली ही समस्या हाताळण्यासाठी केंद्र सरकारनं एक उच्चस्तरीय समिती नियुक्त केली आहे. सात सदस्यांच्या या समितीमध्ये राष्ट्रीय संसर्गजन्य आजार नियंत्रण संस्था, भारतीय वैद्यकीय संशोधन संस्था, तसंच राष्ट्रीय विषाणू संस्थेतल्या तज्ञांचा समावेश आहे. ही समिती राज्य सरकारला या आजाराच्या रुग्णांचं व्यवस्थापन आणि नियंत्रण करण्यामध्ये मदत करेल. याचबरोबर राज्य सरकारच्या उपाययोजनांवरही लक्ष ठेवणार आहे.

**भारत चीन कैलाश**

भारत आणि चीननं यंदाच्या उन्हाळ्यात कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री दोन दिवसांच्या चीन दौऱ्यावर आहेत. या दरम्यान, दोन्ही देशांनी द्वीपक्षीय संबंधावर काल व्यापक चर्चा केली. परराष्ट्र सचिव स्तरावर झालेल्या या बैठकीदरम्यान उभय देशांचे संबंध स्थिर आणि सक्रीय करण्याविषयी लोककेंद्रीत पावलं उचलण्यावर सहमती झाली. दोन्ही देशांदरम्यान थेट विमान सेवा सुरू करणं आणि नद्यांशी संबंधित माहितीबाबत, सहकार्याच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी उभय देशांदरम्यान तज्ज्ञांच्या पातळीवर लवकरात लवकर बैठक घेण्यावरही यात सहमती झाली.

**भारत नेपाळ**

भुकंपा नंतर पुनर्बांधणी प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी काल भारत नेपाळ यांच्यादरम्यान स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त प्रकल्प देखरेख समितीची पाचवी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत नेपाळमध्ये भारत

सरकारच्या सहाय्याने भूकंपोत्तर पुनर्बांधणी प्रकल्पांच्या प्रगतीचा व्यापक आढावा घेण्यात आला. भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व उत्तर भागाचे अतिरिक्त सचिव मुनू महावर यांनी केलं तर नेपाळच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व संयुक्त सचिव पद्मकुमार मैनाली यांनी केलं. 2015 च्या विनाशकारी भुकंपानंतर, भारताने नेपाळला अडीचशे दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचं अनुदान देण्याचं मान्य करण्यात आलं होतं. चार वेगवेगळ्या क्षेत्रांना वाटप करण्यात आले; गृहनिर्माण, शिक्षण, आरोग्य आणि सांस्कृतिक वारसा, या चार क्षेत्रांना हे वापर करण्यात आलं होतं. ज्यामध्ये 100 दशलक्ष अमेरिकन डॉलर्स गृहनिर्माणासाठी आणि इतर तीन क्षेत्रांसाठी प्रत्येकी 50 दशलक्ष अमेरिकन डॉलर्स वाटप करण्यात आले.

**रेल्वे मार्ग**

देशातील लोहमार्गांच्या जाळ्यातील 23 हजार किलोमीटरहून अधिक मार्गांवरून ताशी 130 किलोमीटर वेगानं रेल्वेगाड्या धावू शकतील अशा पद्धतीनं या मार्गांचं आधुनिकीकरण करून भारतीय रेल्वेनं एक मोठा टप्पा गाठला आहे. त्याचबरोबर ताशी 110 किलोमीटरपर्यंत वेगानं गाड्या नेण्यास पूरक ठरावेत या उद्देशानं 54 हजार किलोमीटर मार्ग अद्ययावत करण्यात आल्याचं भारतीय रेल्वेकडून सांगण्यात आलं. याशिवाय रेल्वेमार्गांवर आधुनिक सिग्नलिंग प्रणाली बसवणं, काही धोकादायक ठिकाणी दुर्घटना टाळण्यासाठी कुंपण घालणं अशा कामांचाही रेल्वे मार्गांच्या आधुनिकीकरणाच्या कामांमध्ये समावेश आहे.

**भारत इंडोनेशिया**

भारत आणि इंडोनेशियाच्या नौदल प्रमुखांमध्ये काल झालेल्या द्वीपक्षीय संवादात उभय देशांदरम्यान सागरी सहकार्य दृढ करणे आणि द्वीपक्षीय संबंध मजबूत करण्यासंबंधी चर्चा करण्यात आली. भारताचे नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी आणि इंडोनेशियाचे ॲडमिरल मुहम्मद अली यांच्या दिल्लीत काल सागरी शक्ती सरावाला पुढे नेणे, परिचालन सहकार्य मजबूत करणे आणि समुद्री चाचेगिरी, बेकायदेशीर कारवायांसारख्या सागरी आव्हानांना तोंड देण्यासाठी परस्पर सहकार्य मजबूत करण्याविषयी चर्चा झाली. ॲडमिरल अली यांनी ब्रह्मोस एअरोस्पेसलाही भेट दिली. संरक्षण आणि रणनीती क्षेत्रात द्वीपक्षीय सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी संकल्पना आणि अंतदृष्टीची देवाण घेवाणही करण्यात आली.

**पुरूष हॉकी**

भारतीय हॉकीच्या साखळी सामन्यांमध्ये, काल सुरमा हॉकी क्लबने संघर्षपूर्ण सामन्यात वेदांत कलिंगा लान्सर्सवर 5-3 असा विजय मिळवला. तर दुसऱ्या सामन्यात श्राची राई बंगाल टायगर्सने एसजी पाईपर्सवर विजय मिळवला. आज गोनासिका संघाचा सामना हैदराबाद तुफान संघाशी होणार आहे.

**महिला विश्वकरंडक**

मलेशिया इथं सुरू असलेल्या महिलांच्या 19 वर्षांखालील विश्वकरंडक स्पर्धेत, अंतिम सहा संघांमध्ये निवड होण्यासाठी भारताचा मुकाबला स्कॉटलंडच्या संघाशी होणार आहे. गट एकमध्ये भारतानं यापुर्वीच उपांत्यफेरीत धडक मारली आहे.

**क्रिकेट**

भारताचा इंग्लंडविरूद्धच्या वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतला तिसरा सामना आज होणार आहे. भारतानं या मालिकेत 2-0 अशी आघाडी घेतली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**